# जिल्हाधिकारी कार्यालय ,पुणे १

दुरध्वनी व फक्स -२६१२३९०७ ई मेल -dsopune1@gmail.com

---

क्र. पसन/१४/कावि / 652/२०११
दिनांक:९/११/२०११

**विषयः- लक्ष निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत बीपीएल योजनेतील अन्नधान्याचे तदर्थ / अतिरीक्त मासिक नियतन माहे डिसेंबर २०११**

<u>आदेश</u>

शासनाकडील पत्र क्रं अधापु २०११/ प्र.क्रं १३६-२०११/नापु -२२ दि.३ जुन २०११ व सुधारीत पत्र दिनांक २१ जुन २०११ अन्वये पुणे जिल्हयासाठी उपलब्धतेनुसार माहे डिसेंबर २०११ करिता बीपीएल योजनेचे तदर्थ / अतिरीक्त नियतन दरमहा ८५० मे.टन गहु व ७९२ मे.टन तांदुळ पुणे ग्रामिण भागासाठी मंजुर करण्यात आला आहे.बीपीएल व अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना देणेत येणाऱ्या नियमित प्रति शिधापत्रिका ३५ किलो नियतना व्यतिरीक्त सदरचे जादा नियतन देणेत येत आहे.

केंद्र शासनाने मंजुर केलेले आणि दि.०३.०६.२०११ रोजीच्या पत्रान्वये जिल्हयांना वितरीत केलेले दरमहा अतिरीक्त नियतन आपल्या जिल्हायातील बीपीएल आणि अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना समप्रमाणात वितरीत करण्यात यावे . अंत्योदय योजनेचा पात्र लाभार्थ्यांना नियमित अंत्योदय दराने दरमहा ३५ किलो अन्नधान्य वितरीत करण्यात यावे .नियमित नियतना व्यतिरीक्त उपरोक्त संदर्भित दि.०३ जुन २०११ रोजीच्या पत्रान्वये मंजुर केलेले अतिरीक्त नियतन बीपीएल लाभार्थ्यांना नियमित बीपीएल दराने आणि अंत्योदय लाभार्थ्यांनी अतिरीक्त नियतनाची मागणी केल्यास सदर अतिरीक्त नियतन अंत्योदय लाभार्थ्यांना बीपीएल दराने वितरीत करण्यात यावे.सदर नियतन हे माहे डिसेंबर २०११ साठी बीपीएल व अंत्योदय योजनेच्या नियमित नियतनाव्यतिरीक्त आहे.

तसेच सदर नियतन अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमे अंतर्गत निश्चती करणेत आलेल्या तालुक्याकडील प्राप्त लाभार्थी संख्येनुसार देणेत आले आहे , तरी खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे तालुक्यांना अतिरीक्त नियतनाचे वाटप करण्यात येत आहे.

(आकडे मे.टनात )

| तालुका गोदामाचे नांव | लाभार्थी संख्या (बीपीएल + अंत्योदय) | माहे डिसेंबर २०११ करीता देण्यात आलेले नियतन. | |
|---|---|---|---|
| | | गहु प्रति शिप ५ कि.प्रमाणे | तांदुळ प्रति शिप ४ कि.प्रमाणे |
| जुन्नर | २०८४४ | ९९ | ९२ |
| आंबेगाव | २१०६३ | ९९ | ९३ |
| खेड | १७४१६ | ८२ | ७५ |
| हवेली | ९४३२ | ४६ | ३८ |
| मावळ | ६४२८ | ३० | २८ |
| शिरुर | १४४०७ | ४१ | ४१ |
| त.ढमढेरे | | २८ | २५ |
| मुळशी | १६८७ | ८ | ८ |
| भोर | ९८५८ | ४६ | ४५ |
| वेल्हा | २८२० | १४ | १३ |
| पुरंदर | १३०७० | ६१ | ५६ |
| बारामती | २४४६१ | ११५ | १०८ |
| इंदापुर | २२७८३ | १०७ | १०० |
| दौंड | १४२९९ | ४५ | ४१ |
| केडगाव | | २९ | २९ |
| एकूण | १७८५६८ | ८५० | ७९२ |

जिल्हा पुरवठा अधिकारी पुणे

प्रत- १. तहसिलदार -

२/- सदर योजनेचे बीपीएल तदर्थ/अतिरीक्त मासिक नियतन माहे डिसेंबर २०११ मध्ये बीपीएल लाभार्थींना नियमित नियतनाचे धान्य गहु २० किलो प्रति शिप व अतिरीक्त बीपीएलचे नियतन गहू ५ किलो प्रति शिप असे एकुण २५ किलो गहु(प्रति किलो रु.५/- दराने ) तसेच नियमित बीपीएलचे तांदुळ १५ किलो प्रति शिप + ४ किलो अतिरीक्त तांदुळ प्रति शिप असे एकुण १९ किलो तांदुळ((प्रति किलो रु.६/- दराने ) वितरीत करणेत यावे.सदर वाटप हे बीपीएल शिधापत्रिकाधारकांना बीपीएल दराने करणेत यावे तसेच अंत्योदय लाभार्थींना नियमित अंत्योदय गहु २० किलो प्रति शिप रु. २/- प्रति किलो प्रमाणे व अतिरीक्त ५ किलो गहु बीपीएलच्या दराने (रु.५/- प्रति किलो प्रमाणे ) असे एकुण २५ किलो गहु देणेत यावा व अंत्योदय लाभार्थींना नियमित अंत्योदय तांदुळ १५ किलो प्रति शिप रु ३/- प्रति किलो प्रमाणे व अतिरीक्त ४ किलो तांदुळ बीपीएलच्या दराने (रु.६/- प्रति किलो प्रमाणे)वितरीत करणेत यावे. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश २००१ मधील तरतुदीनुसार

**दरमहा उपयोगिता प्रमाणत्र सादर करावे . माहे नोव्हेंबर २०११ मध्ये नियमित नियतन ३५किलो व्यतिरीक्त जादा अतिरीक्त नियतन देणेत आलेले असल्यामुळे याबाबत स्थानिकरित्या मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी.तसेच शिप धारकांना नियमीत व अतिरीक्त नियतन रास्तभाव दुकानदारामार्फत वाटप होईल याची खातरजमा करावी. अतिरीक्त जादा नियतन मिळणार असल्याची बाब ग्रामस्तरीय दक्षता समितीच्या सदस्यांच्या निर्दशनास आणुन देण्यात यावी.**

२.मा.उपसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय , मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. मा.उपसंचालक नागरी पुरवठा , मंबुई ४००० ०२०

४. FCI कोरेगाव डेपो पुणे -१ यांजकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

५. म.उपायुक्त (पुरवठा) पुणे , पुणे विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

६. श्री बेल्हेकर , अव्वल कारकुन/श्री .जाधव , लिपीक / परिचलन अधिकारी कोरेगाव पार्क/ फुरसुंगी डेपो.

२/-भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातुन गहु व तांदुळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार संयुक्तपणे नमुने घेऊन धान्याचा दर्जा तपासुन तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी तसेच कोणत्याही परिस्थितीत लाभार्थ्यांना निकृष्ठ दर्जाचे धान्य वितरीत केले जाणार नाही यासंबधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे तसेच FCI कोरेगाव पार्क डोपो येथुन दररोज सर्व मंजुर धान्याची पुर्ण उचल करण्यात येऊन धान्य व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच रोजच्या रोज दैनिक अहवाल सादर करावे.

७ **गोदामव्यवस्थापक , श्री सिंदकर -**

२/-FCI कोरेगाव डेपो व फुरुसुंगी डेपो येथील धान्याची उचल १०० टक्के होणेचे दृष्टीने तसेच वाहतुक ठेकेदार यांचेकडुन पुरेशा प्रमाणात वाहने उपलब्ध करुन घेवुन दररोज कमीत कमी ६०० मे.टन धान्य उचल होईल याची दक्षता घ्यावी. व त्यानुसार दररोजच अहवाल या कार्यालयास समक्ष सादर करावा. जर योजनानिहाय धान्याची उचल विहीत मुदतीत पुर्ण झाली नाही तर आपणास जबाबदार धरण्यात येइल याची दक्षता घ्यावी.

८. गोदाम पालक ,

२/- सदर नियतनाच्या धान्याच्या आवक वाटप, व शिल्लक याबाबत दैनिक रिपोर्ट लेखी/फॅक्स व्दारे इकडे सादर करावे तसेच वाहतुक ठेकेदाराच्या आलेल्या गाडया उभ्या नं ठेवता वेळेत खाली करुन घ्यावे.नियतनापेक्षा जादा नियतन उतरुन घेऊ नये.

९. श्री प्रविण कोठारी ,(ग्रामीण) पुणे, सरकारी धान्य वाहतुक ठेकेदार.

२/- माहे डिसेंबर २०११ करीताची धान्याची उचल मुदतीत पुर्ण करण्यासाठी दररोज ५०/५५ ट्रक्स उपलब्ध करुन द्याव्यात ट्रक्स उपलब्ध नसल्यामुळे धान्य व्यपगत झाल्यास आपणास जबाबदार धरणेत येईल.

१०. जनरल मॅनेजर, भारतीय खादय निगम रिजनल ऑफिस (महा) धिरज आर्मा , दुसरा मजला , अनंत कानेकर मार्ग , बांद्रा ईस्ट मुबंई -४०० ०५१ .

११ लेखाधिकारी ना.पु.(पसर १८)

१२ पसह १८ सकलनाकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

१३ पसब -१८ संकलनाकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

जिल्हा पुरवठा अधिकारी पुणे